



दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड–महाराष्ट्र | रविवार दि.१२ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक २४ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये






RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com








### मैत्रिणीच्या अश्लिल ब्लॅकमेलिंगमुळे...

# 'त्या' तरुण डॉक्टरची आत्महत्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षण घेत असलेले डॉ. मंदार उमेश दाभाडे (वय २९) यांनी अंबाजोगाईतील चनई रोड भागातील संत रोहिदास नगर येथील भाड्याच्या खोलीत ६ एप्रिल २०२६ रोजी पहाटे गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. सुरुवातीला या आत्महत्येचे कारण अस्पष्ट होते, मात्र मरण्यापूर्वी मंदार यांनी आपल्या भावाच्या मोबाईलवर पाठवलेल्या एका पासवर्डमुळे या प्रकरणातील धक्कादायक वास्तव उघड झाले असून एका महिला सहकाऱ्याच्या जाचाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी मृत डॉक्टरच्या भावाने दिलेल्या तक्रारीनंतर अंबाजोगाई शहर पोलिसांनी संबंधित महिलेवर गुन्हा दाखल केला आहे.

### अंबाजोगाईतील धक्कादायक प्रकरणाचा मोबाईल पासवर्डमुळे उलगडा



या प्रकरणाचा उलगडा अतिशय नाट्यमयरीत्या झाला असून मंदार यांनी आत्महत्येपूर्वी त्यांचे भाऊ लौकिक दाभाडे यांना त्यांच्या मोबाईलचा पासवर्ड पाठवला होता. अंत्यविधी आटोपल्यानंतर लौकिक यांनी तो पासवर्ड वापरून मंदार यांचा मोबाईल उघडला असता, त्यामध्ये एक सविस्तर सुसाईड नोट आढळून आली. त्यात मंदार यांनी 'सॉरी पप्पा व भैया' असे म्हणत आपल्या वडिलांची आणि भावाची माफी मागितली असून स्वतःवर ओढवलेल्या प्रसंगाचे वर्णन केले आहे. त्यांच्याच ▶▶ पान २ वर

### महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय!

# २ लाख अंगणवाडी सेविका अन् मदतनीस भरतीला मंजुरी

**मुंबई । वृत्तसेवा**

महाराष्ट्र सरकारने महिला व बाल विकास क्षेत्रासाठी मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यात तब्बल २ लाखांहून अधिक अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदांच्या भरतीला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे अनेक महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत, तसेच बालकल्याण योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. महिला व बाल विकास विभागात तब्बल २३ वर्षांनंतर नियमित पदभरतीचा निर्णय घेण्यात आला आहे. एकूण ८६६९ नियमित पदे भरण्यास हिरवा कंदील देण्यात आला आहे. विभागातील काही पदे रद्द करून त्याऐवजी १६५ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे विभागाची रचना अधिक सक्षम आणि कार्यक्षम होणार आहे. अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. याशिवाय, विभागाच्या दैनंदिन कामकाजासाठी २८४३ पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर भरती केली जाणार असून, १,१०,६६४ अंगणवाडी सेविका आणि १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस अशी एकूण २,२१,३२८ मानधनाधारित पदे मंजूर करण्यात आली आहेत. या मोठ्या भरती प्रक्रियेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना रोजगाराच्या संधी वाढतील. तसेच लहान मुलांच्या आरोग्य, पोषण आणि शिक्षणाशी संबंधित सेवा ▶▶ पान २ वर



### शैक्षणिक पात्रता

१. अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस यांना किमान आर्हता १२ वी उत्तीर्ण आवश्यक आहे उमेदवार पदवी/पदव्युत्तर इत्यादी बाबतचे गुणपत्रक व प्रमाणपत्र यांच्या सत्य प्रति जोडणे. २. शैक्षणिक अर्हता / पात्रता प्रमाणपत्र, गुणपत्रके अर्जा सोबत जोडलेली कागदपत्रे स्वतः साक्षांकित केलेली जोडणे बंधनकारक राहील. ३. डी.एड. पदविका, बी.एड. पदविका असल्यास त्याचे गूणपत्रक व प्रमाणपत्रक. ४.उमेदवार उत्तीर्ण असल्यास प्रमाणपत्र जोडणे. ५. तहसिल कार्यालयाचे रहिवासी प्रमाणपत्र (अनिवार्य) ६. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र ७. सक्षम प्राधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र (लागु असल्यास) ८. सक्षम प्राधिकारी यांचे विधवाचे प्रमाणपत्र (लागु असल्यास) ५. शासकिय / अनुदानित संस्थेत दाखल ▶▶ पान २ वर

# पिस्टलसह सोमनवाडीचा धाबा चालक जेरबंद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेने शुक्रवारी रात्री एक महत्त्वपूर्ण कारवाई केली. सोमनवाडी शिवारातील एका धाबा चालकाकडे बेकायदेशीर गावठी बनावटीचे पिस्टल असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. १० एप्रिल २०२६ रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास केलेल्या या कारवाईत पोलिसांनी ४० हजार रुपये किमतीचे पिस्टल जप्त केले असून आरोपीला पुढील तपासासाठी बर्दापूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, मौजे सोमनवाडी शिवारातील धाबा चालक विलास अंकुश चाटे हा स्वतःकडे पिस्टल बाळगत असून तो सध्या धाब्यावरच हजर आहे. या माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलीस पथकाने तातडीने धाब्यावर छापा टाकला. यावेळी करण्यात आलेल्या झडतीत विलास चाटे



### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

याच्याकडे बेकायदेशीर शस्त्र मिळून आले. याप्रकरणी पोलीस नाईक गोविंद भताने यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९७/२०२६ नुसार भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर यशस्वी कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत ▶▶ पान २ वर

# नेकनूरमध्ये कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या ११ गोवंशांची सुटका

**बीड । प्रतिनिधी**

नेकनूर परिसरात कत्तलीच्या उद्देशाने अत्यंत क्रूरपणे साठवून ठेवलेल्या ११ गायींची स्थानिक गुन्हे शाखेने सुटका केली असून याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या मार्गदर्शनाखाली १० एप्रिल २०२६ रोजी रात्री ही कारवाई करण्यात आली. कळसंबर रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये या गायींना चारा-पाण्याविना, तोंडे जमिनीला घासतील अशा पद्धतीने आखूड दोरीने बांधून ठेवण्यात आले होते. या कारवाईत पोलिसांनी ३ लाख १५ हजार रुपये किमतीचा गोवंश जप्त केला असून, आरोपी आरबाज जलाल पठाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात ▶▶ पान २ वर

# महिलेस मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ

**केज । प्रतिनिधी**

शेतात ज्वारीची कापणी करण्यासाठी जात असलेल्या महिलेला सार्वजनिक ठिकाणी काठीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना केज तालुक्यात घडली असून एका विरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. मात्र अद्याप पर्यंत आरोपी आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. दि. ८ रोजी मंगल प्रदीप कांबळे ही महिला दुपारी २:३० च्या सुमारास अभिमान काशीनाथ चाळक यांचे शेतात ज्वारी खुडण्यासाठी जात असतांना गणेश विक्रम चाळक याने तिला मस्साजी जाधव यांच्या घरा समोर सार्वजनीक रस्त्यावर जातीवाचक शिवीगाळ केली. त्याला शिव्या

### ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल,आरोपी फरार

देण्याचे कारण विचारताच तो म्हणाला की, त्याने मंगलचा नवरा प्रदीप कांबळे याला त्याने ४ हजार ५०० रु. दिले आहेत. मी पैसे त्याला दिले आहेत तू मला विचारणारी कोण ? असे म्हणून त्याने मंगल कांबळे हिस काठीने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून केसाला धरून खाली पडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणी मंगल कांबळे यांच्या तक्रारी वरून ▶▶ पान २ वर

### जिल्ह्यातील २ हजार ३६० गोरगरीब विद्यार्थ्यांना मिळणार

# इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी काढण्यात आलेल्या सोडतीतून जिल्ह्यात एकूण २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना ११ ते २० एप्रिल या कालावधीत प्रवेश निश्चित करता येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली. आरटीई अंतर्गत जिल्ह्यातील २१४ शाळांमध्ये २ हजार ४२५ जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी ६ हजार ३१६ अर्ज दाखल झाले होते. ▶▶ पान २ वर

### ठळक मुद्दे

१) सोडतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर प्रवेशाबाबत एसएमएस पाठविण्यात येणार आहेत. मात्र, पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता स्वतः माहिती पडताळून घ्यावी. २) निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकाऱ्यांकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी. पडताळणी समितीकडून कागदपत्रे प्रमाणित झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येईल.



दैनिक मराठवाडा पत्र



# युद्धविराम धोक्यात

इराणसोबत झालेल्या युद्धविरामानंतरही इस्रायलने लेबनॉनची राजधानी बैरूतवर भीषण हल्ले चढवल्यामुळे तणाव वाढला आहे. मंगळवारी रात्री जाहीर झालेल्या युद्धविरामावर उभय देशांनी विजयाचा दावा केला असला तरी शनिवारी होणा-या चर्चेबाबत आता अनिश्चितता निर्माण झाली आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये सुरुंग पेरल्याचे संकेत दिल्याने खनिज तेलाच्या जागतिक वाहतुकीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. कराराचे पालन न झाल्यास यापूर्वीपेक्षाही तीव्र हल्ले करण्यात येतील, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिला आहे. इस्रायल आणि हिजबुल्लाह यांच्यातील संघर्षाबाबत युद्धविराम करारात स्पष्टता नसल्याने वाद निर्माण झाला आहे. इस्रायलने बुधवारी लेबनॉनमध्ये केलेल्या हल्ल्यात २०३ लोक ठार झाले असून १ हजारहून अधिक जखमी झाले आहेत. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या युद्धामधील हा लेबनॉनसाठी सर्वांत भीषण दिवस ठरला. लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने या जीवितहानीची पुष्टी केली असून लेबनॉनचे पंतप्रधान नवाफ सलाम यांनी इस्रायलच्या हल्ल्यांविरुद्ध संयुक्त राष्ट्रात तक्रार करण्याची घोषणा केली आहे. इस्रायलने या हल्ल्यात हिजबुल्लाहचा प्रमुख नईम कासिमचा सहकारी अली युसूफ हर्षी याला ठार केल्याचा दावा केला आहे. दरम्यान हिजबुल्लाहवरील हल्ले सुरू राहतील असे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी स्पष्ट केले आहे. शनिवारी इस्लामाबादमध्ये होणा-या चर्चेसाठी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. वान्स शिष्टमंडळाचे नेतृत्व करणार आहेत. इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर कालीबाफ यांनी इस्रायलचे हल्ले थांबले नाहीत तर गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा दिला आहे. 'द सुफान सेंटर' या संस्थेने हा युद्धविराम कोसळण्याच्या मार्गावर असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणा-या जहाजांसाठी नवीन नकाशा तयार केला आहे. समुद्रात पेरलेल्या सुरुंगापासून या जहाजांना वाचवणे हा त्याचा हेतू आहे. या नकाशात धोकादायक भाग दाखवला आहे. त्यात जहाजांना प्रवेश करण्यास मनाई आहे. तसेच या मार्गावरून जाणा-या जहाजांना मालाची माहिती द्यावी लागेल. त्यानंतरच त्यांना पुढे जाण्यास परवानगी दिली जाईल. तसेच इराणने प्रत्येक पिंपामागे १ डॉलर टोल घेण्याचे निश्चित केले आहे. या सामुद्रधुनीतून



जगातील २० टक्के तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होते. सध्या तेलाची २३० जहाजे या मार्गावर अडकली असून ती तातडीने सोडण्याची मागणी 'युनायटेड अरब अमिराती'च्या तेल कंपनीचे प्रमुख सुलतान अल-जाबेर यांनी केली आहे. जोपर्यंत प्रत्यक्ष कराराचे पालन होत नाही,तोपर्यंत अमेरिकन युद्धनौका आणि सैन्य या भागात तैनात राहील असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षित आणि मुक्त असेल असेही ते म्हणाले. अणु कार्यक्रमावर इराण ठाम आहे. इराणने युरेनियम संवर्धन सुरूच ठेवण्यावर भर दिला असून अणुऊर्जा संस्थेचे प्रमुख मोहम्मद इस्लामी यांनी हा अधिकार टिकवून ठेवणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. अमेरिकेने इराणमधील समृद्ध युरेनियम साठा हटवण्याची अट ठेवली आहे. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यात गेल्या ४० दिवसांपासून सुरू असलेल्या भीषण युद्धाला बुधवारी नाट्यमय वळण मिळाले. पाकिस्तानच्या मध्यस्थीने आणि पुढाकाराने या तिन्ही देशांमध्ये शस्त्रसंधी करण्याबाबत एकमत झाले. या निर्णयामुळे जागतिक स्तरावर शांततेची आशा निर्माण झाली होती मात्र, ही आनंदवार्ता फार काळ टिकू शकली नाही. शस्त्रसंधीच्या काही तासांतच लेबनॉनमध्ये रक्तपात झाला. इस्रायलने केलेल्या या हल्ल्यांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर शस्त्रसंधीच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. इस्रायलच्या कारवाईला सडेतोड उत्तर देण्यासाठी इराणने पुन्हा एकदा होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी केली. त्यामुळे या नाकेबंदीचे दूरगामी परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होण्याची शक्यता आहे. युद्धबंदीला तडा गेल्याने पश्चिम आशिया पुन्हा एकदा भीषण लष्करी संघर्षाच्या छायेत ओढला गेला आहे. शस्त्रसंधीची अधिकृत घोषणा झाल्यानंतर काही तासांतच इराणकडून सौदी अरेबिया आणि कुवेतवर क्षेपणास्त्र हल्ले झाले. त्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलनेही इराणला लक्ष्य केले. इराण-अमेरिका यांच्यातील शस्त्रसंधीच्या वाटाघाटींमध्ये इराणने ठेवलेल्या एका अटीमुळे जागतिक स्तरावर नव्या आर्थिक संकटाची चर्चा सुरू झाली आहे. इराणने आपल्या प्रस्तावात होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडणा-या व्यापारी जहाजांवर इराण आणि ओमानला शुल्क आकारण्याचा अधिकार असावा अशी मागणी केली आहे. या मागणीमुळे आंतरराष्ट्रीय जलवाहतूक आणि जागतिक बाजारपेठेवर मोठा आर्थिक भुर्दंड पडण्याची शक्यता आहे. होर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वांत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण जलवाहतूक मार्ग मानली जाते. जगातील एकूण कच्च्या तेलाच्या पुरवठ्यापैकी साधारण एक पंचमांश तेल याच मार्गावरून वाहून नेले जाते. इराणच्या प्रस्तावानुसार जर प्रत्येक जहाजाला या मार्गावरून जाण्यासाठी शुल्क द्यावे लागले तर पर्यायाने इंधन दर आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. इराणने ही अट आपल्या आर्थिक नुकसानीची भरपाई म्हणून पुढे केली असली तरी त्याचा प्रत्यक्ष फटका तेल आयात करणा-या जगातील प्रत्येक देशाला बसणार आहे. इराणने आपल्या प्रस्तावात शेजारील देश ओमानचाही उल्लेख केला असला तरी ओमानने यावर अत्यंत सावध आणि विरोधी भूमिका घेतली आहे. ओमानच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आणि सागरी तहांच्या नियमांनुसार होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाऊ शकत नाही. ओमानच्या स्पष्ट नकारामुळे इराणच्या अटीला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठबळ मिळणे कठीण आहे. त्यामुळे शस्त्रसंधीच्या प्रक्रियेत हा मुद्दा वादाचा विषय ठरला आहे. इराणच्या या प्रस्तावावर अमेरिकेने अजून कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. जागतिक व्यापार संघटना आणि प्रमुख तेल ग्राहक देश इराणच्या या 'टॅक्स' धोरणाला विरोध करण्याची शक्यता आहे. तात्पुरत्या युद्धविरामाच्या घोषणेचे पडसाद जागतिक अर्थव्यवस्थेसह भारतीय भांडवली बाजारावर सकारात्मक उमटले आहेत. शांतता प्रक्रियेचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम ऊर्जा बाजारपेठेवर झाला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी खुली झाल्याने जागतिक तेल पुरवठ्यात निर्माण झालेला अडथळा दूर झाला आहे. खनिज तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली. ब्रेंट क्रूडच्या दरात १३.८९ टक्क्यांनी मोठी कपात झाली. तेलाचे दर कमी झाल्याने महागाई कमी होण्यास मदत होईल. अर्थात तिन्ही देशांनी युद्धभूमी शांत ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे. माथेफिरू वक्तव्ये टाळली पाहिजेत. कारण माथेफिरू कृतीमुळे आत्मनाशच ओढवणार आहे.

# भीमाचा विचार : जयंतीपेक्षा जास्त,जगण्याची दिशा




जयंती साजरी करणे सोपे असते, पण विचार जगणे कठीण असते. प्रत्येक वर्षी १४ एप्रिल जवळ आली की देशभरात उत्साह दिसतो, मिरवणुका निघतात, घोषणाबाजी होते, पुतळ्यांना हार घातले जातात. पण एक प्रश्न शांतपणे मनात उभा राहतो - आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फक्त आठवतो आहोत की खरोखर समजून घेतो आहोत? कारण भीमराव म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हती, तर तो एक विचार होता, एक क्रांती होती, एक जागृती होती. शिक्षण हे शस्त्र आहे असे बाबासाहेबांनी सांगितले ते केवळ वाक्य नव्हते, तर ते संपूर्ण समाजाला दिलेले दिशा-दर्शन होते. त्या काळात अस्पृश्यतेच्या जाचात अडकलेल्या समाजाला त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून उभे केले. आज शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध आह, पण त्याचे महत्त्व आपण तितक्याच गांभीर्याने घेतो का? हा प्रश्न आजही तितकाच जिवंत आहे. भीमरावांचा संघर्ष हा केवळ वैयक्तिक नव्हता, तो सामाजिक होता. पाण्याचा हक्क मिळवण्यासाठी महाड सत्याग्रह , मंदिर प्रवेशासाठी केलेले आंदोलन, आणि शेवटी संविधानाच्या माध्यमातून समानतेचा अधिकार देणे - हा संपूर्ण प्रवास म्हणजे अन्यायाविरुद्धची लढाई होती. आज आपण समानतेबद्दल बोलतो, पण अजूनही समाजात भेदभावाचे स्वरूप दिसते. मग प्रश्न पडतो- आपण बाबासाहेबांच्या विचारांपासून दूर तर जात नाही ना? मी त्या धर्माला मानतो जो स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता शिकवतो हे त्यांचे वाक्य आजच्या काळात अधिक महत्त्वाचे वाटते. धर्म, जात, भाषा या नावावर होणारे संघर्ष पाहिले की बाबासाहेबांचा संदेश किती आवश्यक आहे हे जाणवते. त्यांनी दिलेली मूल्ये केवळ पुस्तकात राहिली तर त्याचा उपयोग नाही, ती जीवनात उतरवली पाहिजेत. आजचा युवक हा देशाचा भविष्य आहे . पण हा युवक बाबासाहेबांच्या विचारांशी किती जोडलेला आहे ? सोशल मीडियावर पोस्ट टाकणे आणि खऱ्या आयुष्यात त्या विचारांनुसार वागणे यात मोठा फरक आहे. एज्युकेट, ॲजिटेट, ऑरगनाईझ हा मंत्र आजही तितकाच प्रभावी आहे. पण तो केवळ घोषवाक्य म्हणून नाही , तर कृतीत दिसायला हवा . ग्रामीण भागात अजूनही अनेक समस्या आहेत - शिक्षणाची कमतरता, बेरोजगारी , सामाजिक विषमता. या सर्व समस्यांवर उपाय शोधताना बाबासाहेबांचा विचार मार्गदर्शक ठरू शकतो. कारण त्यांनी केवळ समस्या दाखवल्या नाहीत, तर त्यावर उपायही दिले. आज आपण संविधानाचा अभिमान बाळगतो, पण त्यातील मूल्ये पाळतो का? समानता, न्याय आणि स्वातंत्र्य हे शब्द आपण बोलतो, पण ते आपल्या वागण्यात कितपत दिसतात? हा आत्मपरीक्षणाचा विषय आहे. जयंती म्हणजे केवळ उत्सव नाही, तर तो एक संकल्प आहे. बाबासाहेबांना खरे अभिवादन करायचे असेल, तर त्यांच्या विचारांनुसार जगणे आवश्यक आहे . त्यांच्या संघर्षातून प्रेरणा घेऊन समाजात बदल घडवणे हीच खरी जयंती ठरेल. शेवटी एवढेच - भीमराव हे नाव नाही, तो विचार आहे आणि विचार जिवंत ठेवायचा असेल, तर तो कृतीत उतरवावा लागतो.

**चंद्रकांत सरस्वती**
**प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

सक्रिय कार्यकर्त्यांना...

# स्वराज्य जनजागृती परिषदेत सामावून घ्या-गायकवाड



**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक काम मोठ्या प्रमाणात करण्यासाठी समाजातील सक्रिय आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांना स्वराज्य जनजागृती परिषदेमध्ये मोठ्या संख्येने सामावून घ्या, असे आवाहन परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी गायकवाड यांनी केले. बीड येथे ड. अजित देशमुख यांचे निवासस्थानी आज जिल्ह्यातील कार्यकर्त्याची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बालाजी गायकवाड, तर मार्गदर्शक म्हणून परिषदेचे अध्यक्ष ड. अजित देशमुख हे होते. यावेळी बोलताना गायकवाड यांनी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे, त्याचप्रमाणे सामाजिक चळवळ वाढावी, या उद्देशाने सातत्याने कार्य करत रहावे, असे आवाहन केले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी आपली मते व्यक्त केली. परिषदेच्या वाढीचे दृष्टीने सर्व तालुक्यांनी कामाला लागावे, असेही यावेळी ठरले. जिल्ह्यातील सर्व तालुका समित्या आणि जिल्हा समिती स्थापन करण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा आणि विचारविनिमय झाला. यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. विजयकुमार गाडेकर, शिरूर कासार, प्रा. अजित इथापे आष्टी, नारायण बापमारे, राजेंद्र तोर माजलगाव, भागवत ढोरमारे, विशाल पांढरे गेवराई, धनंजय सोळंके, रवींद्र मुंडे परळी, ड. सुभाष शिंदे, मदनराव मस्के, नवनाथ नाईकवाडे, कैलास राऊत, आसाराम आबुज, डॉ. शाम निर्मळ, अंबादास बडे, शेख यासीन पाशा, यांच्यासह अन्य हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परिषदेचे सचिव तुषार पाटील यांनी केली तर आभार प्रदर्शन नवनाथ नाईकवाडे यांनी केली.

# पान १ वरून

## त्या तरूण डॉक्टरची...

एका सहकाऱ्याच्या घटस्फोटित बहिणीसोबत (मूळ रा. छत्रपती संभाजीनगर, ह.मु. रोहिदास नगर, चनई रोड, अंबाजोगाई ) डॉ. मंदार यांची ओळख होती. तिने मंदार यांना स्वतःचे अश्लील व्हिडिओ आणि चॅट्स पाठवून शरीरसंबंधांसाठी प्रवृत्त केले होते. त्यानंतर तिने 'मी गर्भवती असून माझ्याशी लग्न कर, नाहीतर मी विष पिऊन आत्महत्या करेन आणि सुसाईड नोटमध्ये तुझे नाव लिहीन,' अशी धमकी देत त्याला सातत्याने ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. या सततच्या मानसिक त्रासामुळे आणि बदनामीच्या भीतीने डॉक्टर मंदार दाभाडे खचून गेले होते आणि त्यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. या धक्कादायक खुलास्यानंतर लौकिक दाभाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलिसांनी १० एप्रिल रोजी रात्री आरोपी महिले विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम १०८ नुसार आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ससाणे करत आहेत.

## २ लाख...

अधिक सक्षमपणे दिल्या जातील. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी काही आवश्यक कागदपत्रे तयार ठेवणे गरजेचे आहे.

## शैक्षिणिक पात्रता...

असलेल्या अनाथ अर्जदाराचे बाबतीत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र (लागु असल्यास) ९. विधवा व अनाथ सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र (लागु असल्यास) ११. अंगणवाडी सेविका/अंणवाडी मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका म्हणुन कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र. (लागु असल्यास) १२. आधार कार्ड ही भरती प्रक्रिया लवकरच सुरू होण्याची शक्यता असून इच्छुक उमेदवारांनी आतापासूनच तयारीला लागणे आवश्यक आहे.

## इंग्रजी शाळेत...

जागांच्या तुलनेत अर्जांची संख्या जास्त असल्याने ६ एप्रिल रोजी सोडत काढण्यात आली. त्यातून २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून १ हजार ९१२ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली आहे. प्रवेशासाठी निवडयादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात आली असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २० एप्रिलपर्यंत प्रवेश घेण्याची मुदत देण्यात आली आहे. नियमित प्रवेश पूर्ण झाल्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार आहे. यासाठी विविध प्रवेश फेऱ्या राबवून जूनपर्यंत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. ✻ चौकट : या प्रवेश प्रक्रियेत गोरगरीब, वंचित आणि खऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांच्या हक्कांवर गदा येत असून काही अपात्र पालक खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रवेश मिळवत असल्याचे निदर्शनास येत आहे. यात भाडेकरार, आधारकार्ड व इतर कागदपत्रांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत आहे. शिक्षण हक्क कायदा अत्यंत कडक असून त्यानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. नागपूर जिल्ह्यात ज्या प्रकारे खोट्या कागदपत्रांद्वारे प्रवेश घेणाऱ्या पालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले, त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातही अशा प्रकारच्या पालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

## पिस्टलसह सोमनाथवाडीचा...

काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार गोविंद भताने, रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णू सानप यांच्यासह पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे, अतुल हराळे आणि विकास राठोड यांनी सहभाग नोंदवला. आरोपी आणि जप्त केलेले मुद्देमाल बर्दापूर पोलिसांकडे सोपवण्यात आले असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## नेकनूरमध्ये कत्तलीसाठी...

आला आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने आणि त्यांचे पथक नेकनूर पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना, त्यांना आरबाज पठाण याने नगर येथील कत्तलखान्यात पाठवण्यासाठी गायी साठवून ठेवल्याची खबर मिळाली. पोलिसांनी तातडीने पंचांसह छापा टाकला असता, तिथे अकरा गायी अत्यंत दाटीवाटीने आणि निर्दयी स्थितीत आढळून आल्या. या मुक्या प्राण्यांना रात्रीच्या वेळी कत्तलखान्याकडे हलवण्याची तयारी सुरू होती, मात्र पोलिसांनी वेळेत पोहोचून हा प्रयत्न हाणून पाडला. या प्रकरणी आरोपीवर महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांना छळ प्रतिबंधक कायद्यान्वये नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या सर्व गायींना सुरक्षिततेसाठी बीड येथील कै. तुकाराम गुरुजी गोधाम प्रकल्पात पाठवण्यात आले आहे. ही यशस्वी कामगिरी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, महेश विघ्ने, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते आणि गणेश मराडे यांच्या पथकाने फत्ते केली. या कारवाईमुळे परिसरात अवैध धंदे चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## महिलेस मारहाण करून...

गणेश विक्रम चाळक याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. १९२/२०२६ भा. न्या. सं. ११५(२),११८,(१) ३५१(२), ३५२ यासह ट्रॉसिटीचे कलम ३(१) (आर), ३(१) (एस), ३(३) (व्ही ए) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम हे करीत असून अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# जरुड (बीड) येथील श्री भैरवनाथ यात्रा परंपरा, इतिहास आणि ग्रामीण संस्कृतीचा भव्य सोहळा

## छबीना, रथोत्सव आणि कुस्तीमुळे गाव दुमदुमले ; रथयात्रेस तहसीलदार चंद्रकांत शेळके उपस्थित



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील जरूड येथे वसलेले प्राचीन आणि ऐतिहासिक महत्त्व असलेले श्री भैरवनाथ मंदिर सध्या यात्रोत्सवामुळे भक्तांच्या गर्दीने फुलून गेले आहे . धार्मिक श्रद्धा , परंपरा , सांस्कृतिक कार्यक्रम आणि ग्रामीण जीवनशैली यांचा अद्भुत संगम असलेली ही यात्रा मराठवाड्यातील एक महत्त्वाची ओळख बनली आहे . डोंगररांगांच्या सान्निध्यात वसलेले हे देवस्थान केवळ श्रद्धास्थान नसून इतिहासाची साक्ष देणारे केंद्र आहे . येथे आढळलेल्या शिलालेखांमधून शके ११९४ च्या काळात मंदिराला दान देण्यात आल्याचे पुरावे मिळतात , त्यामुळे या देवस्थानाचा इतिहास बाराव्या शतकापर्यंत मागे जात असल्याचे मानले जाते . भैरवनाथ हे शिवाचे उग्र आणि रक्षण करणारे रूप मानले जाते आणि ग्रामीण महाराष्ट्रात ग्रामदैवत म्हणून त्यांना विशेष स्थान आहे




. गावाचे रक्षण करणारा देव , संकटांपासून वाचवणारा आणि न्याय देणारा देव अशी त्यांची प्रतिमा लोकमानसात दृढ असून त्यामुळे ही यात्रा वर्षानुवर्षे मोठ्या श्रद्धेने साजरी केली जाते .

यंदाच्या यात्रेला पारंपरिक पद्धतीने सुरुवात झाली असून काल मोठ्या उत्साहात छबीना मिरवणूक काढण्यात आली . ढोल – ताशांचा गजर , लेझीम पथकांचा ताल आणि भजन – कीर्तनाच्या स्वरात देवाची मिरवणूक गावभर फिरवण्यात आली . महिलांनी ओव्या म्हणत सहभाग घेतला , तर युवकांनी नृत्य करत वातावरण रंगवले . लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व समाजघटक सहभागी झाल्यामुळे संपूर्ण गाव भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले . आज यात्रेचा मुख्य सोहळा असलेला रथोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला . भैरवनाथ महाराजांचा सुशोभित रथ गावातून मिरवण्यात आला आणि रथ ओढण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली . रथ ओढल्याने मनोकामना पूर्ण होते या श्रद्धेमुळे हजारो भाविक सहभागी झाले . जयघोष आणि ढोल – ताशांच्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला . या रथयात्रेस तहसीलदार चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके यांनी भेट देऊन दर्शन घेतले तसेच ग्रामस्थांशी संवाद साधत यात्रेच्या व्यवस्थेचा आढावा घेतला .

यात्रेचा तिसरा दिवस पारंपरिक कुस्ती स्पर्धांनी गाजणार असून परिसरातील नामांकित मल्ल या स्पर्धेत सहभागी होणार आहेत . ग्रामीण भागातील कुस्ती ही केवळ क्रीडा नसून संस्कृतीचा भाग असल्याने गावकऱ्यांमध्ये याबाबत विशेष उत्सुकता आहे . विजेत्या मल्लांना रोख बक्षिसे आणि मानाचा किताब दिला जातो . या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे निसर्ग आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम . डोंगरमाथ्यावर वसलेले मंदिर , हिरवळ आणि शांत वातावरण यामुळे हे ठिकाण पर्यटनासाठीही आकर्षण ठरत आहे . यात्रेमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळत असून लहान दुकाने , खाद्यपदार्थ स्टॉल आणि विविध व्यावसायिक उपक्रम सुरू झाले आहेत . ग्रामस्थांनी स्वच्छता , पाणी आणि सुविधा यासाठी विशेष प्रयत्न केले असून प्रशासनाकडूनही आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे .

एकूणच , जरूड येथील श्री भैरवनाथ यात्रा ही श्रद्धा , इतिहास आणि ग्रामीण संस्कृतीचा जिवंत सोहळा ठरत आहे . छबीना , रथोत्सव आणि कुस्ती या पारंपरिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ही परंपरा आजही तितक्याच उत्साहात जपली जात असून भविष्यात पर्यटनाच्या दृष्टीने या स्थळाला अधिक महत्त्व प्राप्त होईल , असा विश्वास व्यक्त केला जात आहे .

# मराठा सेवा संघातर्फे प्राजक्तताई धस यांना स्त्री शक्ती प्रेरणा पुरस्कार जाहीर

**आष्टी । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय पातळीवर समता, समानता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय या मूल्यांचा पुरस्कार करून समाजामध्ये काम करीत असलेल्या मराठा सेवा संघातर्फे राज्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष इंजि. विजय घोगरे यांच्यातर्फे इंजि. तानाजी बापू जंजिरे यांनी आष्टी येथील पत्रकार परिषदेमध्ये हे पुरस्कार जाहीर केले.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शिवमती शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या राजकीय सामाजिक सांस्कृतिक व महिला सक्षमीकरण कार्यामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना समाजभूषण पुरस्कार देण्यात



येत आहे तर महानंद डेअरीच्या संचालिका आष्टी येथील शिवमती प्राजक्तताई सुरेश धस यांनी वेगवेगळ्या माध्यमातून स्त्री सुधारण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल त्यांना स्त्री शक्ती प्रेरणा पुरस्कार जाहीर करण्यात आला आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन ८७ वर्षे वयाचे आष्टीचे सुपुत्र सावळेराम कृष्णाजी जंजिरे काका ,यांनी मुंबई येथे राहून गावाकडील विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल व दीपस्तंभ होऊन मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांना *जीवनगौरव पुरस्कार* जाहीर करण्यात आलाआहे.

हे तीनही पुरस्कार आज दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी आष्टी येथील राजमाता जिजाऊ विद्यार्थी वस्तीगृह लोकार्पण सोहळा कार्यक्रमाच्या वेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांच्या उपस्थितीमध्ये देण्यात येणार आहेत . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष इंजिनिअर विजय घोगरे हे राहणार आहेत. यावेळी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, मराठवाडा भूषण आ.सुरेश धस, आ.सतीश भाऊ चव्हाण, इंजि.नवनाथ घाडगे, शिवश्री अर्जुनराव तनपुरे, शिवश्री मनोज दादा आखरे, शिवमती सीमाताई बोके,माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर,माजी आ. बाळासाहेब आजबे काका यांचेसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पंचक्रोशीतील प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर ,इंजिनिअर, वकील व समाजाच्या सर्व थरातील कार्यकर्त्यांनी या लोकांपर्यंत लोकार्पण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन इंजि.तानाजी जंजिरे, भास्करराव निंबाळकर, लक्ष्मण रेडेकर,प्रा. डॉ.बाबासाहेब मुटकुळे ,प्रा. डॉ. दत्तात्रय नरसाळे, प्राचार्य शशिकांत कन्हेरे, सुरेश पवार सर, बन्सीधर मोरे , ॲड सीताराम पोकळे आदी मान्यवरांनी केले आहे.

# गंगामसला येथे 'छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्व अभियान' कार्यक्रम; कलेक्टर गैरहजर, आमदारही मधेच निघून गेल्याने चर्चांना उधाण

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील गंगामसला येथे दि. १० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता 'छत्रपती शिवाजी महाराज राज्यस्व अभियान' अंतर्गत महत्त्वपूर्ण शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, जिल्हाधिकारी (कलेक्टर) कार्यक्रमास गैरहजर राहिल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे.

या अभियानाच्या माध्यमातून महसूल विभागाच्या विविध योजना, सेवा तसेच नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने तोडगा काढण्याचा उद्देश होता. कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक प्रशासनाने केले असून, उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना योजनांची सविस्तर माहिती दिली. यावेळी अनेक शेतकरी व नागरिकांनी आपल्या समस्या मांडत तत्काळ निराकरणाची मागणी केली.




दरम्यान, जिल्हाधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबत विविध तर्कवितर्क लावले जात असून काहींनी वाळू माफियाच्या भीतीमुळे ते गैरहजर राहिल्याचा आरोप केला आहे. मात्र, यासंदर्भात अधिकृत स्तरावर कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. याच कार्यक्रमाला उपस्थित असलेले आमदार प्रकाश सोळंके हे कार्यक्रम सुरू झाल्यानंतर काही वेळातच निघून गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे कार्यक्रमाच्या अध्यक्षीय उपस्थितीत खंड पडून काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत, महत्त्वाच्या शासकीय कार्यक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांची अनुपस्थिती योग्य नाही. यामुळे प्रशासनाबद्दल चुकीचा संदेश जातो, अशी प्रतिक्रिया दिली. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणीही करण्यात येत आहे. एकूणच, गंगामसला येथील हा कार्यक्रम नियोजित पद्धतीने पार पडला असला तरी जिल्हाधिकारी यांच्या अनुपस्थिती आणि आमदारांच्या मधल्या काळात निघून जाण्यामुळे कार्यक्रमाला वेगळे वळण मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित विडाला 30 लाखांचा नफा

**● पतसंस्थेत ६० कोटींच्या ठेवी तर ५० कोटींचे कर्ज वाटप ;चेअरमन बाबासाहेब मुळे यांची माहिती..**

**केज । प्रतिनिधी**

विडा येथिल शिवरामपुरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत ६० कोटींच्या ठेवी असून त्यापैकी पतसंस्थेने एकूण ५० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.पतसंस्थेने २३ कोटींची गुंतवणूक केली आहे.पतसंस्थेकडे सध्या ४ कोटींचा स्वनिधी आहे. दरम्यान पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ३० लाखांचा निव्वळ नफा झाला आसून पतसंस्थेच्या विडा,सारूळ(बरड),चिंचोली माळी,येवता,वाघेबाभूळगाव, नेकनूर,धारूर,केज,युसूफवडगाव,वडवणी,चौसाळा येथे एकूण ११ शाखा कार्यरत आहेत.तसेच पतसंस्था लवकरच ७० कोटींच्या पुढे वाटचाल करणार असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिली आहे.

बीड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे यांनी विडा येथे शिवरामपुरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेची स्थापना केली होती.पतसंस्थेने कृष्णा को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन विजयकांत मुंडे व युवा नेते अतुल दादा मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहकांचा विश्वास संपादन करत यशस्वीरित्या वाटचाल केली आहे.त्यामुळे पतसंस्थेने अत्यंत अल्पावधीत ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर उत्तुंग भरारी घेतली असून पतसंस्थेने ६० कोटींच्या पुढे वाटचाल केली आहे. पतसंस्थेला उत्तम व्यवस्थापना बद्दल विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.पतसंस्थेचे सर्व संचालक मंडळ,खातेदार, ठेवीदार,सभासद,हितचिंतक व ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ६० कोटींच्या ठेवी प्राप्त झाल्या असून त्यापैकी पतसंस्थेने ५० कोटींचे कर्ज वाटप केले आहे.यामाध्यमातून पतसंस्थेने कर्जदारांना विविध व्यवसाय उभारून स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली आहे. दरम्यान पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षात ३० लाखांचा निव्वळ नफा मिळाला आहे.पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुनीता पवार उपमुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चौरे सर्व शाखेचे शाखा व्यवस्थापक,सर्व शाखेचे कर्मचारी यांनी उत्तम कर्तव्य बजावत आसून पतसंस्था लवकरच ७० कोटींच्या पुढे वाटचाल करणार असल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुळे यांनी दिले आहे.

# साहित्याने समाजमनाला आकार दिला : शहाजिंदे

## शांतीवनातील मराठवाडा साहित्य संमेलनाचा भावनिक वातावरणात समारोप



**आर्वी । प्रतिनिधी**

बोलणे एक आणि वागणे दुसरे अशी तफावत समाजात रुजली आहे. घटनेवर सारेच बोलतात मात्र प्रत्यक्ष आचरण घटनेच्या तत्वानुसार कोणीच करत नाहीत. मग आपल्या बोलण्या आणि वागण्यातच तफावत असेल तर सामाजिक एकता संपली, बंधुभाव संपला हे बोलण्याचा आपल्याला अधिकार नाही, असे सांगत साहित्याने समाज मनाला आकार दिला. साहित्यामुळे समाजात प्रगल्भता आली,असे विचार संमेलन अध्यक्ष फ. म. शहाजिंदे यांनी समारोपीय भाषणात मांडले. शांतीवन प्रकल्पाने केलेल्या पाहुणचाराने भारावून गेल्याचेही त्यांनी सांगितले.

मराठवाडा साहित्य परिषद आणि भवानी विध्यार्थी कल्याण प्रतिष्ठान, शांतीवन आर्वी यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित केलेल्या ४५ व्या मराठी साहित्य संमेलनाचा शनिवारी (दि.११) सायंकाळी समारोप झाला. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. फ. म. शहाजिंदे, कौतिकराव ठाले, आसाराम लोमटे, रामचंद्र तिरुके, दीपा क्षीरसागर, रामचंद्र काळुंखे, डॉ. अशोक बेलखोडे, गणेश मोहिते, दीपक नागरगोजे, भास्कर बडे, कावेरी नागरगोजे यांच्यासह साहित्यिक, कवी आणि साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील म्हणाले,

### ● शांतीवनच्या प्रेमाने आम्ही साहित्यिक भारावलो: दादा गोरे

**शांतीवनच्या कार्याचे मूल्यमापन होणे अशक्य आहे. आज पर्यंतच्या सर्व साहित्य संमेलणातील हे आगळे वेगळे सम्मेलन आहे. इथल्या माणसांच्या आणि मुलांच्या प्रेमाने आम्ही भारावून गेलो आहोत, अशा भावनिक शब्दात दादा गोरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी दीपककाका आणि कावेरीताई यांचा मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

सामाजिक काम हे विस्तवावरून चालण्यासारखे आहे. कारण समाजाची परिस्थिती खूप विदारक बनत आहे. अशा परिस्थितीत मराठवाडा साहित्य संमेलनात भीषण सामाजिक प्रश्नावर भाष्य करणारे परिसंवाद ठेवले. संमेलनात अशी चर्चा ठेवणे धाडसाचे असते. हे धाडस साहित्य परिषदेने केले असे सांगत ठाले पाटील यांनी शांतीवन प्रकल्प आणि दीपक नागरगोजे यांच्या कामाचे तोंडभरून कौतुक केले. शांतीवन येथे झालेल्या या ४५ व्या संमेलनाने आम्हा साहित्यिकांचा आणि मराठी साहित्य परिषदेचा गौरव वाढवला. शांतीवन येथील संमेलन आणि येथील पाहुणचार दीर्घाकाल स्मरणात राहील असे ठाले पाटील शेवटी म्हणाले.

संमेलनाचे अध्यक्ष फ. म. शहाजिंदे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले, संमेलनाचा अध्यक्ष कधी होईल असे वाटले नव्हते. परंतु, माझ्या अध्यक्षतेखाली झालेले संमेलन शांतीवन सारख्या पवित्र ठिकाणी आणि यशस्वी झाले, याचा खूप आनंद आहे. जावयाची सासुरवाडीत व्यवस्था व्हावी तशी आम्हा साहित्यिकांची येथे झाली. संमेलनातील आजचे दोनही परिसंवाद ऐकूण भारावून गेलो. आजची पिढी एवढी बिनधास्त आणि सडेतोड बोलते आहे, हे एकूण आनंदित झालो.

### ● सरस्वतांची सेवा करण्याची संधी मिळाली हे भाग्य: दीपक नागरगोजे

**शांतीवन प्रकल्पात ४५ वे मराठवाडा साहित्य संमेलन अतिशय उत्सहात पार पडले. समारोपच्या कार्यक्रमात दीपक नागरगोजे यांनी मराठवाडा साहित्य परिषदेने आम्हाला राज्यभरातील साहित्यिक आणि सरस्वतांची सेवा करण्याची संधी दिली, याबद्दल सर्वांचे आभार मानले. साहित्यिक, कवी यांनी नेहमी शांतीवन येथे यावे.येथील मुलामध्ये राहून त्यांना मार्गदर्शन करावे, असे आवाहन दीपक नागरगोजे यांनी केले.**

### ● ठरवांचे वाचन...

**४५ व्या साहित्य संमेलनात १४ ठराव घेण्यात आले. यात बँकानी शेतकऱ्यांना शेती कर्ज द्यावे, मराठवाड्यातील रेल्वे मार्ग दुहेरी करावेत, कृष्णा खोऱ्यातील मराठावड्याचे हक्काचे २१ टी एमसी पाणी द्यावे, शेतमालाला हमी भाव देऊन जागतिक बाजारपेठ खुली करावी, पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद करणे थांबवावे, सामाजिक एकोपा जपण्यासाठी राजकीय पक्षाच्या वाचाळ विरांना आवरावे, जायकवाडी प्रकल्प येथील सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करावा, शासनाने मोफत योजना बंद कराव्यात, जादू टोणा कायद्याची कडक अमलाबजावणी करावी. प्रत्येक पोलीस ठाण्यात जादूटोणा विरोधी कक्ष सुरु करावा अशा मागण्यांचे ठराव संमेलनात संमत करण्यात आले.**

दैनिक मराठवाडा पत्र दि. ११/०४/२०२६

**टी.सी. हरवला आहे.**

**कैलास गोरखनाथ रुपनर या नावाचा इयत्ता दहावी पास चा टीसी आडगाव ते माजलगाव प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क साधावा.**

**मो .– ७०३८३२७४६०**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९७/२०२६**

**आश्राबाई येडे वि, निरंक**

ज्यापेक्षा सर्जेराव पि सखाराम येडे, हे दिनांक १९/०९/२०२५ रोजी मौजे मोरगाव, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार- **१. आश्राबाई भ्र, सर्जेराव येडे, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगाव, ता. जि. बीड, २. मच्छिंद पि सर्जेराव येडे, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३. राजेंद्र पि सर्जेराव येडे, वय ४० वर्षे, धदा नौकरी, रा. वरीलप्रमाणे, ४. जानकाबाई भ्र. पंढरीनाथ कपतेकर, वय ५८ वर्षे, धंदा, घरकाम, रा उखंडा, ता. पाटोदा, जि बीड, ५. सिताबाई भ्र. बद्री जाधव, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगाव, ता. जि. बीड, ६. सुमल भ्र. श्रीहरी काटगे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा नागोबाचीवाडी, ता. घनसागवी, जि. जालना**

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हकात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हकाबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक शाबीत दिसल्यास, त्याना / अर्जदाराना सदर मधल नामे सर्जेराव पि. सखाराम येडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

**प्रकरणाची पुढील तारीख २८/०४/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ३० मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **(ॲड. रोटे डी. एम. यांचे मार्फत)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व . स्तर बीड**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार दि. १२ एप्रिल २०२६ •



*आज हे चित्र पाहिल्यावर काळजात चर्रर्र झालं... आपल्या सोयीसाठी, आपल्या घरापर्यंत वीज पोहचावी म्हणून आपण निसर्गाला किती ओरबाडतो, हे या चित्रातून स्पष्ट दिसतंय.... पण त्या झाडाचं मोठेपण बघा... त्याने स्वतःच्या शरीराचे दोन भाग केले, पण त्या विजेच्या तारांना मार्ग करून दिला. झाड म्हणतंय, तुला तुझा मार्ग मिळू दे, मी थोडं वाकून घेतो... फक्त मला तोडू नकोस. माणूस आणि निसर्ग यांच्यात आज असाच समतोल राखण्याची गरज आहे. प्रगती हवीच, पण निसर्गाचा गळा घोटून नको.*

# गेवराईत काँग्रेसच्या सृजन अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## काँग्रेस नेत्या नीतू वर्मा, एम. एम. शेख यांनी केले मार्गदर्शन

### ● काँग्रेस विचार घराघरात पोहोचविणार : तालुकाध्यक्ष महेश बेदरे

**गेवराई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या आज गेवराई काँग्रेस पक्षाच्या नवीन बस स्थानका समोरील मध्यवर्ती कार्यालयात येथे 'संगठन सृजन अभियान' संपन्न झाले या अभियानास गेवराई मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अभियानास प्रमुख मान्यवर म्हणून काँग्रेसच्या केंद्रीय प्रभारी नीतू वर्मा मॅडम व सहप्रभारी माजी आमदार एम एम शेख यांनी प्रमुख मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीसुर्य



ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन कार्यक्रमास सुरुवात केली.याबाबत अधिक माहिती अशी की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाची पक्ष बांधणी, संघटना मजबुतीकरण हा उद्देश लक्षात घेता या माध्यमातून तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व इतर निवडीचे मुख्य काम या अभियानाच्या माध्यमातून केले जाणार असे प्रतिपादन काँग्रेसच्या केंद्रीय प्रभारी नीतू वर्मा यांनी संघटनेचे बळकटीकरण येणाऱ्या काळात काँग्रेसला पूर्वीचे दिवस आणण्यासाठी हे पाहून थेट काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उचलले असून काँग्रेस एक्शन मोडवर आले असून ग्राउंड लेव्हलला जाऊन प्रत्येकाशी चर्चा करूनच संघटनेला बळ दिले जाणार आहे असे त्यांनी प्रतिपादन केले त्याचबरोबर काँग्रेसचे सहप्रभारी एमएम शेख यांनी जिल्हाभरातील काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याला काँग्रेस पक्ष येणाऱ्या काळात बळ देणार असून सामान्य लोकांना केंद्रीय स्तरावरून पदाधिकारी म्हणून निवडले जाणार असल्याने भविष्यात काँग्रेस शिवाय आता पर्याय राहणार नसल्याचे माजी आमदार एम एम शेख असे उद्गार यांनी आपल्या बोलताना मनोगता मध्ये व्यक्त केले. काँग्रेसचे गेवराई तालुका अध्यक्ष महेश बेदरे यांनी प्रास्ताविक भाषणामध्ये बोलताना सांगितले की आगामी काळात गेवराई तालुक्यातील घराघरात काँग्रेसचे संघटन पोचणार असून काँग्रेसचा विचार जनसामान्यात पाठवून काँग्रेसला गेवराई तालुक्यात आगामी काळात सुगीचे दिवस आणू असे ठामपणे आश्वासन दिले आगामी काळात काँग्रेसच्या नेतृत्वाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पालन करून काँग्रेसच्या सर्व जुन्या नव्या पद अधिकाऱ्यांना सोबत घेऊन गेवराई तालुका काँग्रेस मय करू असे सांगितले यावेळी काँग्रेसच्या पदे अधिकाऱ्यांचे मत ऐकून घेऊन मान्यवरांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमास राजसंघटन सुजन अभियानच्या बीड जिल्हा प्रमुख मा.श्रीमती नितू वर्मा जी निरीक्षक अ.भा. काँग्रेस कमिटी नवी दिल्ली यांच्या सह मा.एम.एम.शेख (माजी आमदार) मा. सुरेंद्र गोडजकर (संघटन निरीक्षक), जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण कुमार शेप, बाळासाहेब ठोंबरे,फरिद देशमुख, बीड तालुका अध्यक्ष गणेश बजगुडे, दत्ता कांबळे, रमेश सानप, सुनील नागरगोजे, गेवराई तालुका अध्यक्ष महेश बेदरे, तालुका उपाध्यक्ष मधुकर, मनोहर चाळक, भारत ढवारे, उमर शेख, जुनेद बागवान,सय्यद सिराज, गणेश कोल्हे, बाळासाहेब साबळे, राजाराम पवार, यांच्यासह काँग्रेसचे शेकडो पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे यांनी केले.

## थोडक्यात...

### श्री विठ्ठल रुक्माई मंदिर वर्धापन दिनानिमित्त आंबिका चौक येथे अखंड हरिनाम सप्ताह

#### बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे सोमवारी भक्तिमय कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आंबिका चौक येथे श्री विठ्ठल रुक्माई मंदिर वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने सोमवार, दि. १३/०४/२०२६ रोजी बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांची विशेष कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. श्री विठ्ठल रुक्माई मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये भजन, हरिपाठ, प्रवचन तसेच अखंड हरिनाम संकीर्तन यांचा समावेश आहे. संपूर्ण सप्ताहभर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून 'राम कृष्ण हरी'च्या जयघोषाने परिसर दुमदुमणार आहे. या कीर्तन सेवेत बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते हे भक्तांना भक्तीमार्ग, नामस्मरणाचे महत्त्व आणि संत परंपरेतील शिकवण यावर मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या सुमधुर वाणीतील कीर्तनामुळे भाविकांना आध्यात्मिक अनुभूती मिळणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक भाविक, महिला मंडळ, युवक मंडळ तसेच श्री विठ्ठल रुक्माई मंदिर समितीचे सदस्य परिश्रम घेत आहेत. तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे बीड शहरात धार्मिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचे सुंदर दर्शन घडणार असून भक्तीमय वातावरणात संपूर्ण परिसर उजळून निघणार आहे.

### तलवाडा येथील त्वरितादेवी यात्रा परिसर अंधकारमय विस्वस्त मंडाळाचे दुर्लक्ष

**तलवाडा । प्रतिनिधी**



तलवाडा येथील जाज्वल्य दैवत माता त्वरितादेवी यात्रा ऊत्सवास नुकतीच सुरुवात झाली असुन यात्रेचा प्रथम आठवडी बाजार शनिवार दिनांक ११/४ /२००२६ रोजी प्रतिवर्षा प्रमाणे यात्रा परिसरातच भरवन्यात आला असल्याचे पहावयास मिळाले. त्वरितादेवी यात्रा ऊत्सव तब्बल महिनाभर चालत असल्याने तलवाडा येथील आठवडी बाजार प्रतिवर्ष यात्रा परिसरातच भरवन्यात येत आसतात. पाच आठवडे या ठिकाणी शनिवार रोजी बाजार भरत असल्याने यात्रेच्या शोभेत लक्षनिय भर पडत असल्याचे नेहमी दिसुन येते. मात्र यंदा यात्रा परिसर अंधकारमय दिसुन येत असल्याने या ठिकाणी आलेल्या विविध व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केल्याचे ऐकावयास मिळत आहे. त्वरितादेवी मंदिर परिसरात भवानी मातेचे मंदिर असुन या मंदिरा पासुन त्वरितादेवी माता विराजमान असलेल्या त्वरितादेवी गडाचे (डोंगर) अंतर जवळपास पाचशे मिटरचे असुन या दोन्ही मंदिराच्या मुख्य रस्ता परिसरात असलेल्या विध्युत पोलवर प्रतिवर्ष लाईटची व्यवस्था केलेली आसते ज्या मुळे हा परिसर यात्रामय दिसुन यतो. मात्र या वेळी त्वरितादेवी मातेला नऊ दिवस तेल लागुन तेल ऊतरुन यातेला सुरवात होऊन देखील या परिसरातील पोलवर बल्ब भरवन्यात न आल्याने यात्रा परिसरात अंधकारमय परिस्थिति दिसुन येत असल्याने नागरिकातुन विस्वस्त मंडळाप्रती नाराजी व्यक्त केल्या जात आहे.

# आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष प्रवीण भाई तोगडिया यांची ॲड. कृष्णा दाभाडे यांच्या घरी सदिच्छा भेट....

### ● गेवराईकरांकडून तोगडिया यांचे उस्फूर्त स्वागत

**गेवराई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष प्रवीण भाई तोगडिया यांनी लातूरला जात असताना गेवराई येथे यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुप पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून गेवराई शहरातील विधीज्ञ कृष्णा दाभाडे यांच्या घरी भेट दिली यावेळी त्यांनी उपस्थित लोकांची संवाद साधला. यावेळी प्रवीणजी तोगडिया म्हणाले की, आता आपल्याला हिंदू म्हणून पुढे आले पाहिजे व समृद्ध हिंदू, सुरक्षित हिंदू, आदरणीय हिंदू, निरोगी हिंदू अशी संकल्पना भारतात सर्व घराघरात पोहचली पाहिजे. भारतातील प्रत्येक गावात, शहरातील प्रत्येक कॉलनीत श्री हनुमान चालीसा केंद्र तयार करून हिंदूंना एकत्र करा. हिंदूंची संख्या झपाट्याने कमी होत आहे.याचा गांभीर्याने विचार करायला हवा. आम्ही हिंदू समाजासाठी आपले शरीर, मन आणि धनाने काम करू. भारतातील बहुसंख्य हिंदूंना कायम



ठेवू, लोकसंख्या नियंत्रणासाठी कायदा करू, समान नागरी कायदा करू, ५ कोटी बांगलादेशींना देशातून हद्दपार करावे, अशी मागणी आम्ही सरकारकडे करू,आम्ही हिंदूंकडूनच मागणी करू,आम्ही हिंदूंना रोजगार देऊ,आमच्या घरात तीन मुले असतील, ती आमची इच्छा असेल

हिंदू धर्म : आपले जीवन, संपत्ती, आरोग्य, कीर्ती, आनंद वाढविण्याचे हे शास्त्र आहे. त्यांच्या शरीरात जितकी जास्त ऊर्जा असेल तितकी त्यांची संपत्ती आणि आरोग्य अधिक चांगले होण्यासाठी रोज सकाळी उठून मी धरणीमातेला व कुलदेवतेला नतमस्तक होऊन आई-वडिलांचे आणि घरातील वडीलधाऱ्यांचे पाय पडून दर्शन घेऊन , दररोज देवाची पूजा करत जा ,तसेच दररोज तुळशीला पाणी घालून पक्ष्याला दररोज आहार आणि पाणी देऊ असा संकल्प आज करा असे आवाहन प्रवीण जी तोगडिया यांनी केले. यावेळी ॲड. कृष्णा दाभाडे,हेमंत जैन,डॉ. हेमंत वैद्य,विकास पवार, ईश्वर पवार,आदी उपस्थित होते. यावेळी त्यांच्या सुरक्षारक्षकासह गेवराई पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ,दीपक लंके,यांच्या संपूर्ण टीम सह पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# सक्रिय कार्यकर्त्यांना स्वराज्य जनजागृती परिषदेत सामावून घ्या : बालाजी गायकवाड

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक काम मोठ्या प्रमाणात करण्यासाठी समाजातील सक्रिय आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांना स्वराज्य जनजागृती परिषदेमध्ये मोठ्या संख्येने सामावून घ्या, असे आवाहन परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी गायकवाड यांनी केले.

बीड येथे ॲड. अजित देशमुख यांचे निवासस्थानी आज जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बालाजी गायकवाड, तर मार्गदर्शक



म्हणून परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित देशमुख हे होते. यावेळी बोलताना गायकवाड यांनी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे, त्याचप्रमाणे सामाजिक चळवळ वाढावी, या उद्देशाने सातत्याने कार्य करत रहावे, असे आवाहन केले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी आपली मते व्यक्त केली. परिषदेच्या वाढीचे दृष्टीने सर्व तालुक्यांनी कामाला लागावे, असेही यावेळी ठरले. जिल्ह्यातील सर्व तालुका समित्या आणि जिल्हा समिती स्थापन करण्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा आणि विचारविनिमय झाला. यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. विजयकुमार गाडेकर, शिरूर कासार, प्रा. अजित इथापे आष्टी, नारायण बापमारे, राजेंद्र तोर माजलगाव, भागवत ढोरमारे, विशाल पांढरे गेवराई, धनंजय सोळंके, रवींद्र मुंडे परळी, ॲड. सुभाष शिंदे, मदनराव मस्के, नवनाथ नाईकवाडे, कैलास राऊत, आसाराम आबुज, डॉ. शाम निर्मळ, अंबादास बडे, शेख यासीन पाशा, यांच्यासह अन्य हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परिषदेचे सचिव तुषार पाटील यांनी केली तर आभार प्रदर्शन नवनाथ नाईकवाडे यांनी केली.

# कवडगाव (बु.) येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन

**कवडगाव (बु.) । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कवडगाव (बु.) येथे भव्य-दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा दि. १९ एप्रिल २०२६ रोजी (वैशाख शुद्ध द्वादशी) पासून प्रारंभ होणार असून सात दिवस चालणार आहे. या नाम सप्ताहादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये काकडा भजन, विष्णू सहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन तसेच दुपारच्या सत्रात रामायण ग्रंथ वाचन होणार आहे. दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत बीड जिल्ह्यातील नामवंत कीर्तनकार महाराजांची कीर्तनसेवा होणार असून त्यानंतर हरिजागराचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात ह.भ.प. बळीराम महाराज निपटे, ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज शास्त्री, ह.भ.प. श्रीकृष्ण महाराज यादव, ह.भ.प. गणेश महाराज लोंढे, ह.भ.प. शिवानंद महाराज शास्त्री (परतूर) तसेच ह.भ.प. मधुसूदन महाराज गवारे यांची कीर्तनसेवा संपन्न होणार आहे. रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प. शांतिब्रह्म पांडुरंग महाराज मुंडे यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

# बहुजननायक महात्मा जोतिबा फुले यांचे विचार समाजाला दिशादर्शक : रमेश पोकळे

**बीड । प्रतिनिधी**

समाजातील विषमता नष्ट करून तळागाळातील समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बहुजननायक, थोर समाजसुधारक आणि महामानव महात्मा जोतिराव फुले यांनी कार्य केले. त्यांच्या विचारांनी सदैव समाजाला योग्य दिशा दिली असून, त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले. येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालयात बीड आणि संभाजी राजे ग्रंथालय व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय बीड येथे महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला संस्था सचिव प्रा गणेश पोकळे, प्रा. बप्पासाहेब



हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे पोकळे म्हणाले की, महात्मा फुले यांनी शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजातील वंचित घटकांना उभारी दिली. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजहितासाठी कार्य करणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी महात्मा फुले यांचा विचार उद्धृत करत सांगितले की, सत्याच्या वाटेवरती चालत असताना एकटे पडलात तरी चालेल; पण चुकीच्या गोष्टींचे समर्थन करणाऱ्या गर्दीमध्ये मिसळू नका. हा संदेश प्रत्येकाने जीवनात आचरणात आणणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रा. सुहास गाढवे, प्रा.अफरोज सय्यद, प्रा. महेश नेवडे, दिपक जाधव, संध्या खोसे,शंकर इंगोले, सचिव चौरे व विद्यार्थी उपस्थित उपस्थित होते.